# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Nirbhaya Pathak**

**Date of Good Work done** :- **15/01/2023**

**Brief of the work done :-**

निर्भया पथकाचा रोड रोमियोंवर चाप ; महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी निर्भय पथक दक्ष.

# निर्भया पथकाचा रोड रोमीयोंवर चाप ; ४२ जणांवर करण्यात आली कारवाई

## वाशिम निर्भया पथकाची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच कोणत्याही तरुणींना रोडरोमीयोंकडून त्रास होत असेल तर कुणासही न घाबरता तरुणी व महिलांनी निर्भया पथकाकडे बिनधास्त तक्रार करावी अशी माहिती जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

दरम्यान जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी महिला व मुलींच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेले निर्भया पथक नव्याने ॲक्टीव्ह केले असुन दररोज निर्भया पथक चिडीमारी करणाऱ्या तरुणांवर कारवाई करतात. आता पावेतो अशा प्रकारच्या ४२ कारवाया करण्यात आल्याची माहिती पोलीसांनी दिली. निर्भया पथक हे महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असल्याने ज्या महिलांना व मुलींना टवाळखोर तरुणांकडून कोणत्याही प्रकारचा त्रास होत असेल तर त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावा . जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक सक्रीय होवुन महिलां किंवा तरुणींच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार आल्या नंतर त्यावर चौकशी अंती कारवाई केली जाते. अशी माहिती पीएसआय एस.एम.ईथापे यांनी दिली.

विशेष म्हणजे जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिलांच्या संरक्षणासाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आल्याने कोणत्याही प्रकारची महिलांबाबत तसेच शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या छेडखानीची बातमी किंवा माहिती मिळाल्यास निर्भया पथक चौकशी करुन बिना विलंब कारवाई करते. यापुढेही अशीच कारवाई करण्यात येईल अशी माहीती देण्यात आली. (जि.प्र.)



जिल्हयातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई केल्या जाते. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्टेशन अधिकारी हा फिर्याद दाखल करणाऱ्यांच्या फिर्यादीची योग्य ती दखल घेतो किंवा नाही याची देखील तपासणी केली जाते. कायद्यानुसार कोणतीही तक्रार आल्यानंतर त्याची शहानिशा होणे गरजेचे आहे. कारण निरपराध व्यक्तीवर कारवाई होऊ नये हा या मागचा हेतु असल्याचे पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.